Literacy for a Billion

Movie: Bhaloo
Year: 1980

Song: Parn pachu savla savla
Lyricist: P Sawalaram

पर्ण पाचू सावळा सावळा
पर्ण पाचू सावळा सावळा
विठ्ठल माझा मळा
विठ्ठल माझा मळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा

समानतेच्या विहिरीमधली
पुण्याईची चंद्रभागा
पुण्याईची चंद्रभागा
न्हाऊ घालते पावन करते
चराचरातील पांडुरंगा
चराचरातील पांडुरंगा
पाटामधूनी तिर्थ चालले
पिकवीत कांदा भाजी मुळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा

मणी मोत्यांचा मंदील बांधून
आ... मणी मोत्यांचा मंदील बांधून
डुलतं शिवारी राव जोंधळा
विठ्ठल नामे कण कण टिपतो
पांडुरंग पांडुरंग पांडुरंग पांडुरंग
विठ्ठल नामे कण कण टिपतो
पाखरांचा हसरा मेळा
ऊसात भरता रसाळ गोडी
मोर सांगतो निळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा

तिर्थरूप त्या प्राण पित्याची
मीच समाधी बांधलेली
मीच समाधी बांधलेली
भाव भक्तिची फुले वाहीली
हात जोडूनी सांज सकाळी
हात जोडूनी सांज सकाळी
या मातीचा अबीर कपाळी
भक्त पुंडलीक पुत्र खुळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा
पर्ण पाचू सावळा सावळा
पर्ण पाचू सावळा सावळा
विठ्ठल माझा मळा
विठ्ठल माझा मळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा
मी वारकरी आगळा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*